सातारा जिल्हा परिषद,सातारा

सामान्य प्रशासन विभाग

कार्यालय दूरध्वनी क्रः-०२१६२-२३८१२६ 548 Email-dyceogad@gmail.com


जाक्र.साप्रवि/आयटीसेल / २०८ /२०१९

दिनांक : ०६ / ०६ / २०१९

प्रति,

**मे सॉफ्टकी सोल्यूशल्स,**

**२३/४, स्वप्नमंदिर सोसायटी,एरंडवणे पुणे,**

विषय- जिल्हा परिषद सातारा मुख्य इमारतीमध्ये बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणेचा वार्षिक देखभाल मक्ता निश्चित करण्याची जाहिर निविदा वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत..

सोबत सातारा जिल्हा परिषद सातारा मुख्य इमारत व परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणेचा वार्षिक देखभाल मक्ता निश्चित करण्याचा आहे. त्यासाठी तमाम सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणा सेवा पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्याची पुरेशाप्रमाणात प्रसिध्दी होण्यासाठी सदरची जाहिर निविदा सातारा जिल्हा परिषद साताराच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी ही विनंती.

सोबत-प्रसिध्द करावयाची जाहिर निविदा

6|6|19

**(सत्यजीत बडे)**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)**

**जिल्हा परिषद सातारा**

# सातारा जिल्हा परिषद, सातारा
## सामान्य प्रशासन विभाग

कार्यालय दूरध्वनी क्र:-०२१६२-२३८१२६ Email-dyceogad@gmail.com

**जाहिर निविदा सुचना**

जाक्र.साप्रवि/आयटीसेल / २०७ /२०१९

दिनांक : ०६ / ०६ / २०१९

विषय- **जिल्हा परिषद सातारा मुख्य इमारतीमध्ये बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणेचा नॉन कॉम्प्रेंसेसिव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल मक्ता निश्चित करण्यासाठी स्थानिक सेवा पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्याबाबत..**

सातारा जिल्हा परिषद सातारा मुख्य इमारतीमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे (डोम कॅमेरा-23 नग, बुलेट कॅमेरा-5 नग व पीटीझेड-1 नग असे एकूण 29 कॅमेरे) बसविण्यात आले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अक्र | मालाचा तपशिल | संख्या |
|---|---|---|
| 1 | Dome Camera - 0.07 Lux@F1.2, AGC ON 0 Lux with IR 80 Angle of View ICR, 3 MP, Max Images resolution 2048x1536, 4 mm Lens Motion detection, IR Range 40 meters, 3D DNR and DWDR and BLC, WDR, Vendal proof (2 year warranty) | 23 |
| 2 | Bullet Camera - 0.07 Lux@F1.2, AGC ON 0 Lux with IR 80 Angle of View ICR, 3 MP, Max Images resolution 2048x1536, 4 mm Lens Motion detection, IR Range 40 meters, 3D DNR and DWDR and BLC, WDR, Vendal proof (2 year warranty) | 5 |
| 3 | PTZ Camera - 3 mp, IR distance 130mts full HD PTZ IP 1280x960 P, 30x Optical Zoom, 3D intelligent positioning, SVC, Defog, 3D DNR, DWDR, ICR, WDR, Aarm input/ output privacy mask, 24 volt Ac/High-PoE | 1 |
| 4 | NVR - 100 Mbps Bit Rate input Max, Third party network camera supported, UP to 5 MP resolution supported, HDMI and VGA output at up to 1920x1080 P resolution (2 year warranty) | 2 |
| 5 | 22" inch all in one LED TV output - hdmi, av, tv VGA port | 2 |
| 6 | W.D.AV 2TB hard disk surveillance Hard Disk | 4 |
| 7 | SMPS 12 V-10AMP Brisk | 6 |
| 8 | RJ 45 connector D-Link | 56 |
| 9 | Power supply connector | 28 |
| 10 | Cat 6 polycab Lan Cable D-Link | 5300 Mtr |
| 11 | RJ 6 Polycab Cable | 100 Mtr |
| 12 | 2.5 3core Electirc Cable Polycab | 500 Mtr |

| अक्र | मालाचा तपशिल | संख्या |
|---|---|---|
| 13 | 1.5 2core Electirc cable polycab | 2500 Mtr |
| 14 | 6 AMP MCB | 6 |
| 15 | D-link 8 port switch | 6 |

तरी वर नमुद केलेल्या तपशिलानुसार सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वार्षिक देखभाल व दुरुस्ती मक्ता निश्चित करण्यासाठी स्थानिक तमाम सीसीटीव्ही सेवापुरवठाधारकांस कळविणेत येते की, सातारा जिल्हा परिषद मुख्य इमारत व परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा नॉन कॉम्प्रेंसेसिव्ह पध्दतीचा वार्षिक देखभाल मक्ता सोबत दिलेल्या अटी व शर्तीनुसार निश्चित करण्याचा आहे. त्यासाठी आपण जिल्हा परिषद सातारा मुख्य इमारत व परिसरातील कॅमेरा व इतर यंत्रणेची तांत्रिकदृष्टया पाहणी करुन त्यानुसार दरपत्रक देण्यात यावे. दरपत्रके सादर करताना पाहणीचा तांत्रिक अहवाल सादर करण्यात यावा.

सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वरील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या सर्व साहित्याचा वार्षिक देखभाल व दुरुस्ती मक्ता निश्चित करण्यासाठी इच्छुक आहेत त्या स्थानिक सेवा पुरवठादारांनी सर्व करासहित एकत्रित दरपत्रक या कार्यालयास सिलबंद लखोटयातून खाली सही करणार यांचे नावे दिनांक-१५ /०६/२०१९ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत समक्ष अथवा पोस्टाने पोहोच करावे. दरपत्रकातील दर हे पुढील सहा महिन्यांसाठी ग्राहय धरणेत येतील.

उपरोक्त सीसीटीव्ही कॅमेरा वार्षिक देखभाल व दुरुस्ती मक्ता निश्चित करणाऱ्या सेवापुरवठादारांची दरपत्रके विहित दिनांकास व वेळेत अथवा तत्पुर्वी या कार्यालयास प्राप्त न झालेस ती स्विकारली जाणार नाही. एक अथवा सर्व दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

शक्य झाल्यास प्राप्त होणारी दरपत्रके त्याच दिवशी सायंकाळी ५.०० वाजता सर्व उपस्थित पुरवठाधारक यांचे समोर उघडणेत येतील.

(सत्यजीत बडे)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)**
**जिल्हा परिषद सातारा**

प्रति,

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

# जिल्हा परिषद सातारा मुख्य इमारतीमध्ये बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणेचा नॉन कॉम्प्रेसेसिव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल मक्ता निश्चित करण्याच्या अटी व शर्ती

-0-0-0-0-0-0-0-0-

**अटी व शर्ती-**

- देखभाल व दुरुस्ती करारा कालावधीत सेवा पुरवठादार सीसीटीव्ही कॅमेरे व इतर आवश्यक असणारी उपकरणे व इतर बाबींची तांत्रिकदृष्टया देखभाल व दुरुस्ती करणे. सदर बाबींसाठी खालील नमूद केलेल्या देखाभाल व दुरुस्ती सेवा पुरवेल.

१) व्यावसायिकदृष्टया अनुभव असणाऱ्या तज्ञ कर्मचाऱ्यामार्फत देखभाल व दुरुस्ती सेवा देण्यात यावी.

२) सेवा पुरवठादाराने सीसीटीव्ही कॅमेरे व इतर आवश्यक असणारी उपकरणे व इतर बाबींची दुरुस्ती ही कार्यालयीन वेळेत करण्यात यावी.

३) देखभाल व दुरुस्तीसाठी तक्रार नोंदविल्यानंतर १२ तासाचे आत तक्रारीच्या अनुषंगाने देखभाल व दुरुस्ती करावी. (तक्रार फोन कॉल, ईमेल अथवा पत्राने कळविण्यात येईल)

४) देखभाल व दुरस्ती करताना सीसीटीव्ही कॅमेरे व इतर आवश्यक असणारी उपकरणे व इतर बाबीं बदल्याची आवश्यकता वाटत असल्यास सदर उपकरणांची लेखी मागणी या कार्यालयास तात्काळ नोंदविण्यात यावी व सदर उपकरणे उपलब्ध झालेनंतर २४ तासाचे आत बदलण्यात यावीत.

५) सेवा पुरवठादाराने आठ दिवसातून किमान एक वेळेस समक्ष भेट देवून सीसीटीव्ही कॅमेरे व इतर आवश्यक असणारी उपकरणे व इतर बाबीं योग्य रित्या कार्यान्वित असलेबाबतचा लेखी अहवाल (Visit Report) या कार्यालयास सादर करावा.

६) या कार्यालयाने मागणी केल्याप्रमाणे उपलब्ध असलेली सीसीटीव्ही रेकॉर्डीगची आवश्यक माहिती डाऊनलोड करुन पेनड्राईव्हवर देणेची आहे.

७) तक्रार नोंदविल्यापासून २४ तासाचे आत देखभाल व दुरुस्ती न केल्यास प्रति दिन रक्कम रु.१००/- याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

८) करारामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीचे पालन न केल्यास सेवा पुरवठादाराचा करार रद्द करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सातारा यांनी राखून ठेवले आहेत.

९) देखभाल व दुरुस्ती कराराचा कालावधी - आदेशाच्या दिनांकापासून एक वर्ष राहिल. कराराचा एक वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर यापूर्वी देखभाल व दुरुस्तीसाठी दिलेल्या सेवेचा दर्जा बघून पुढील कालावधीसाठी करार निश्चित करण्यात येईल.

१०) सदर यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करत असताना आपणांमार्फत सीसीटीव्ही कॅमेरे व इतर यंत्रणेची मोडतोड झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित सेवा पुरवठादाराची आहे.

११) सदर यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करत असताना आपणांस अथवा आपल्या कर्मचाऱ्यास अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित सेवा पुरवठादाराची आहे. याबाबत जिल्हा परिषद सातारा मार्फत कोणत्याही प्रकारची दखल घेतली जाणार नाही.

१२) सदर देखभाल व दुरुस्ती करारावाबत देण्यात येणारी रक्कम ही दोन टप्प्यात (सहा-सहा महिने) देण्यात येईल. त्याप्रमाणे आपले मागणी पत्र व देयक या कार्यालयास दोन प्रतीत मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र),जिल्हा परिषद सातारा यांचे नावे देण्यात यावे. तसेच सेवा पुरवठादाराचे देयकातून सुरक्षा ठेव म्हणून 10% रक्कम कपात करण्यात येईल व सदरची कपात करण्यात आलेली रक्कम ही सेवेचा दर्जा पाहुन एक वर्ष कालावधी पूर्ण झाल्यानंतर मागणीनुसार परत करण्यात येईल.

१३) वरील अटी व शर्ती मान्य असलेबाबत सेवा पुरवठादाराने रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारानामा करुन देण्याचा आहे.

स्थळ पाहणी अहवाल - संबंधित सेवा पुरवठादारांनी जिल्हा परिषद सातारा येथे कार्यरत असलेल्या सीसीटीव्ही कॅमेरे व इतर आवश्यक असणारी उपकरणे व इतर बाबींची तांत्रिकदृष्टया पडताळणी करुन त्याबाबतचा स्थळ पाहणी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
सातारा जिल्हा परिषद